श्री साईनाथ प्रसन्न

# श्री साईलीला

## .मासिक.

वर्ष २१ ] आक्टो. नोव्हें. डिसेंबर १९४४ [ अंक १०-११-१२

बाबा बाबा, निशिदिनिं मना, बोल रे बोल बाबा ॥
बाबा नामीं, कितितरी असे, दिव्य जादु अबाबा ॥



बा बालिश्य त्यज, शरण जा त्या, न भूप नबाबा ॥
बा बाधा ना, तुज यमगृहीं, बाबाची जबाबा ॥

FEB 1945

नलिनीदलगतजलमतितरलम् । तद्वज्जीवनमतिशयचपलम् ॥
क्षणमपि सज्जनसंगतिरेका भवति भवार्णवतरणे नौका ॥ १ ॥

—शंकराचार्य

२७-१-४५ वार्षिक वर्गणी रु. ३-८-०

संपादकः—रावसाहेब यशवंत जनार्दन गाळवणकर,
साई प्रसाद, टर्नर रोड, वांद्रें-मुंबई

# श्री साई लीला

## श्री साईनाथ प्रसन्न



गोदावर्याः प्रवाहो विलसति यदुदक्पार्श्वतो योजनैकम् ।
प्रादुर्भूत्वाऽत्मभूत्या निशजनितमहे शीलधिक्षेत्रधाम्नि ॥
सर्वज्ञातीयवृंदैर्विविधजनपदादागतैः स्तूयमानः ।
पूर्णब्रह्मैव साक्षाद्विजयति भुवनं पावयन्साइनाथः ॥

वर्ष २१ } आक्टो. नोवें. डिसेंबर १९४४ { अंक १०-११-१२

## सोन्याचे कण

१ परमात्मा दयाघन आहे असा श्रुतिशास्त्रांचा डिंडिम आहे व माझा अनुभवही आहे. लोकांवर व माझ्यावर आलेल्या अनेक आपत्तींचा सूक्ष्म विचार करून पाहातां शेवटीं हेंच सार निघतें, कीं देव दयाळु आहे.

२ ज्यांना आपण आपत्ति, संकटें, विघ्नें, आघात, दु:खप्रसंग असें वरवर पाहून म्हणतों ते सारे प्रसंग भगवंताच्या दयेचेच निदर्शक आहेत, असें खोल विचारांतीं आढळून येतें.

३ आपत्ती ह्या मोह उडवून जगाचें नश्वरत्व प्रतीतीला आणतात; आपत्तीमुळें ह्या विश्वाच्या जंजाळापासून क्षणभर तरी दूर सरून आपला आपण विचार करितों; आपत्तीमुळें वैराग्याची शीतल छाया अनुभवतां येते; आपत्तीमुळें ज्ञानांजन डोळ्यांत पडतें; आपत्तीमुळें अहंकाराचे भूत पळून जातें; आपत्तीमुळें ताठरलेलें मन नम्र

होतें; आपत्तीमुळें परमेश्वर व साधूसंत आठवतात. अशा या आपत्ती आपल्या कल्याणार्थच देवानें धाडल्या आहेत असें विवेक आपणांस शिकवतो.

४ आमचीं काया–वाचा–मनाचीं कर्में किती अमंगळ असतात हें पाहातां आमच्या दुष्कृतींच्या मानानें आम्हांस भोगाव्या लागणाऱ्या यातना कांहींच नाहींत व हा विचार मनांत येऊन देवाच्या दीनदयाळुत्वाच्या स्मरणांत मी गहिंवरून जातों.

५ चार पोरांनीं गोंधळ मांडला तर आईही त्रासून जातें. पण सर्व जीवांचा मायबाप सर्वांची गाऱ्हाणीं नित्य ऐकत असून कंटाळत नाहीं. आमच्या शब्दाकडे त्याचे कान सदा लागलेलें. काय म्हणावें ? भगवान, तुम्हीं दयासागर आहांत, उदार आहांत, चांगले आहांत, थोडें घेऊन फार देतां. जीव घेऊन आपलें परिपूर्ण ऐश्वर्य देतां. कवडी घेऊन परीस देतां. मूठभर पोहे घेऊन सोन्याची नगरी देतां. सोन्याची नगरी कोणती तीं आहे ठाऊक ? अमृतरायांना विचाराः

श्रीकृष्णें सुदामजीला सोन्याची नगरी दिली ॥
स्वानुभूती हृदयामधली ॥ ध्रु० ॥

संतदासानुदास,
यशवंत जनार्दन माळवणकर

---

## संत समागम

जीवित ही काय चीज आहे बरें ? संयोग आणि वियोग, पुन्हां संयोग आणि वियोग—अशी ही अखंड परंपरा, याचें नांव जीवित ! जा ये, ये जा, एवढेंच संसाराचें रूप आहे.

२ आयुष्याचा किती भाग आपण व्यर्थ दवडीत असतों ? आळसांत, व्यसनांत, निद्रेंत, कलहांत, क्षुद्र विषयसंगांत बहुतेक आयुष्य व्यर्थ जातें. जो आयुष्याचा एकही क्षण व्यर्थ घालवीत नाहीं त्याला शंभर वर्षें थोडीं नाहींत. सत्कालक्षेपांत जेवढा काळ जातो तेवढेंच जगणें, बाकीचें सर्व मरणच आहे. पामर जगून मरतात, संत मरून जगतात.

३ पामरांना जगणें ठाऊक नाहीं, संतांना मरणें ठाऊक नाहीं.

४ संतांना संकोच नसतो. महासागरासारखें त्याचें अंतरंग विशाल असतें. हिमाचलासारखे ते धीरगंभीर असतात. ते आकाशाच्या पैलपार जातात व त्यांच्या पायांना

पृथ्वी अगर पार्थिव कांहींच स्पर्शत नाहीं. गिरिशिखरावरील पठारासारखें विस्तृत, शांत, निर्मळ असें त्यांचें अंतरंग असतें. तेथें दऱ्याखोरीं किंवा डबकीं कांहीं एक नसतात. तेथें नारायणाचा एक अखंड आनंद मात्र असतो. अन्य वृत्तींचे वारे तेथें वाहातच नाहींत. तेथें गेल्याशिवाय तेथली मौज समजावयाची नाहीं. अशी मौज श्रीसद्गुरु साईमाउलीचे समागमांत निरंतर भोगावयास मिळाली.

संतदासानुदास,

**यशवंत जनार्दन गाळवणकर**

---

## श्रीसद्गुरु साईबाबांचा दिव्य अनुभव

सांताक्रुझ येथें राहाणाऱ्या पाठारे प्रभुज्ञातींतील, श्री साईबाबांवर निस्सीम भक्ती असणाऱ्या एका कुटुंबातील श्रीमती ताराबाई गोरक्षकर नांवाची स्त्री दादर येथील एका हॉस्पिटलमध्यें नर्सची नोकरी करीत असते. तारीख १२ डिसेंबर १९४४ रोजीं रात्रौ ती आपले नर्सचे कामावर असतांना सुमोरं दोन वाजण्याचे सुमारास एक शरीरानें धिप्पाड असलेला इसम पाठी मागील चुकुन उघडे राहिलेल्या दारानें एकाएकीं त्या हास्पीटलमध्यें शिरला व त्या नर्सच्या खोलींत शिरून जवळ रिकाम्या असलेल्या पलंगावरचा चादर उचलून त्या नर्सच्या तोंडावर एकदम घालून ती ओरडेल म्हणून एकदम तिच्या गळ्याभोंवती गुडाळूं लागला. त्याचा हेतू तिला तशीच बांधून ठेवून तेथील सामानसुमान चोरून न्यावयाचें असा दिसला. कारण एकदोन दिवसांपूर्वीं त्या हास्पिटलमधील विजेच्या दिव्याचे ग्लोब असेच चोरीस गेले होते. त्या नर्सनें आपणास मदत मिळावी म्हणून मोठ्यानें आरोळ्या मारल्या, परंतु तिचे मदतीस कोणी आलें नाहीं. शेवटीं, ती श्रीसाईबाबांची भक्त असल्यामुळें, तिनें तीन वेळां 'श्रीसाईबाबां धांवा' म्हणून आरोळ्या मारल्या. त्याबरोबर तो इसम एकदम घाबरून पळाला व आपला पाठलाग करतील म्हणून बाहेरून दारास त्यानें कडी घातली. अशा रीतीनें त्या बाईची सुटका अकस्मात झाली व ती श्रीसाईबाबांस धन्यवाद देऊं लागली.

---

श्रीसाईनाथ प्रसन्न

# श्रींच्या पुण्यतिर्थीच्या उत्सवाचा अहवाल

श्रीसच्चिदानंद सद्गुरु साईबाबामहाराज मु. शिर्डी यांचे २६ व्या पुण्यतिथीचा उत्सव मिती आश्विन शु. १० बुधवार ते मिती आश्विन शु. १३ पावेतो चार दिवस झाला. उत्सवास मद्रास, मुंबई, पुणें, नगर, सोलापूर, नाशीक वगैरे ठिकाणांहून बरीच भक्तमंडली आली होती. उत्सवांत बाहेरगांवचे भक्तांस व संस्थानचे नोकर, सेवेकरी यांस चार दिवस चहा, फराळ, भोजन देण्यांत आलें. बुधवारीं नियमित कार्यक्रमाव्यतिरिक्त दोन प्रहरीं संस्थान गवई श्री. विठ्ठलराव यांचें कीर्तन, रथाची मिरवणूक, अष्टांगसेवा व श्री. पिरोजबाई दस्तुर ( मुंबई येथील रेडियोस्टार ) यांचें सुश्राव्य गायन झालें. गुरुवार ता. २८।१०।४४ रोजीं पहाटे श्रींचे समाधीवर भक्तांचे लघुरुद्र, विष्णुसहस्रनामार्चन, पूजा वगैरे धर्मकृत्यें झालीं. नंतर गांवांतील लोकांनीं कोपरगांवाहून श्री गंगागोदावरीच्या १५० कावडी भरून आणल्या. त्यांची मिरवणूक होऊन कावडींचें पूजन करून त्या श्रींचे समाधीवर घालण्यांत आल्या व त्यानंतर गांवांत भिक्षा-मिरवणूक झाली. तदनंतर सर्व भक्तांनीं श्रींचे समाधीस पंचामृत अभ्यंगस्नान घालून वस्त्रें, पुष्पहार, शेरे, फुलें–फळें, मिठाई, शिर्णी, श्रीफल वगैरे अर्पण केले. तदनंतर संस्थान गवई विठ्ठलराव यांचें श्रीसाईबाबांचें चरित्रावर कीर्तन झालें. नंतर आराधना विधी, भोजनसमारंभ झाला. रात्रौ ( चावडी गुरुवारची ) झाली. नंतर पालखीची गांवांतून मिरवणूक, गारुडभारुड वगैरे झाले. त्यानंतर श्री. पिरोजबाई दस्तुर, मुंबई यांचें पुन्हां गायन झालें, व श्री. नानासाहेब रासने यांनीं श्रीपुढें संगीत भजनें म्हटलीं. शुक्रवारीं सकाळीं श्रींचे जुने कपड्यांची श्रीद्वारकामाईत भक्तांना प्रसाद म्हणून विक्री करणेंत आली. दोन प्रहरीं संस्थान गवई यांचें कीर्तन व रात्रौ श्रींचे रथाची गांवांतून मिरवणूक काढण्यांत आली. शनिवारीं सकाळीं श्रीगोपाल काला कीर्तन, दहीहंडींतील प्रसाद वांटल्यानंतर सर्व भक्त श्रींचा तीर्थ-प्रसाद घेऊन भोजन वगैरे करून आपापले गांवाकडे गेले व उत्सव समाप्त झाला.

कोजागिरीचे दिवशीं रात्रौ संस्थान गवई यांचें कीर्तन, चंद्रपूजन, तुलसी अर्चन वगैरे झालें. नंतर सर्वत्रांस दूध, प्रसाद देण्यांत आला.

उत्सवानिमित्त संस्थान नोकर, सेवेकरी वगैरे मंडळीस वस्त्रें वांटलीं गेलीं; तसेंच एका मद्रासी भक्तांनीं वांटण्याकरितां पाठविलेले पैसे प्रत्येक नोकर सेवेकरी यांस सव्वा रुपया याप्रमाणें संस्थानचे सन्माननीय ट्रस्टी रावसाहेब यशवंतराव

गाळवणकर यांचे हस्तें देण्यांत आले. तसेंच संस्थानचे सन्माननीय ऑ. सेक्रेटरी श्री. शंकरराव बलवली यांनीं लेजिम खेळणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना पोषाख—टोपी, शर्ट, पँट, (गणवेष) स्वतःचे खर्चाने शिवून आणलेले दिले व ड्रिलमध्यें बरीच सुधारणा केली.

२ उत्सवांत शिरडी गांवचे गोरगरीब लोकांस गूळशिरा (भंडारा) भोजन देण्यांत आलें. तसेंच लेजिमवाले व कावडीवाले यांनाहि एक दिवस भोजन देण्यांत आलें. उत्सवांत भिक्षा व आराधनाविधी हीं दोन कामें श्री. र. भा. पुरंदरे यांनीं उत्तम तऱ्हेनें केलीं.

येणेंप्रमाणें उत्सवाचा अहवाल आहे. ज्यांनीं ज्यांनीं द्रव्यरूपानें, अंगमेहनतीनें व इतर अनेक प्रकारें श्रींची सेवा केली त्या सर्वांचे श्रीसाईबाबांनीं कृपादृष्टीनें रक्षण करावें इतकीच शेवटीं श्रींचे चरणीं प्रार्थना करून हा लेख संपवितों.

आपला नम्र,

**विठ्ठल यशवंत मराठे**

---

## श्रीसाईबाबा शिरडी संस्थान

# नोटीस

श्रीसाईबाबांची शिरडी संस्थान कमिटी श्रीसाईबाबांचे भक्तासाठीं असें प्रसिद्ध करिते, कीं तारीख १ जानेवारी १९४५ पासून ज्या भक्तांना शिरडी संस्थानाकरितां कोणत्याही प्रकारची वर्गणी पाठवावयाची असेल त्यांनीं ती खालीं लिहिलेल्या आफिसरांपैकीं कोणाकडेहि पाठवावी व त्यांचेकडून पावती घ्यावी—

१ श्रीयुत रा. रा. **श्रीधर नारायण खारकर,**
ऑनररी खजिनदार, शिरडी संस्थान,
३७ चरई रोड, ठाणे, जि. ठाणे.

२ म्यानेजर, शिरडी संस्थान, शिरडी, पोस्ट रहाते,
तालुका कोपरगांव, जिल्हा अहमदनगर.

२. दुसरे कोणाकडे वर्गणी पाठविल्यास शिरडी संस्थान जबाबदार नाहीं.

३. पैसे पोस्टाचे साध्या पाकिटांतून पाठवूं नयेत. अशा पाठविलेल्या पैशाबद्दल संस्थान जबाबदार नाहीं.

संस्थान कमिटीतर्फे,

ता. १ जानेवारी १९४५ **शंकरराव द. बलवली**
ऑनररी सेक्रेटरी, शिरडी संस्थान

# नोटीस

सरकारच्या सध्याच्या पेपर कंट्रोल ऑर्डरमुळें श्रीसाई लीला मासिकाचीं (तिमाही) पानें कव्हरांचीं पानें धरून १८ पेक्षां जास्ती छापितां येत नाहींत, म्हणून शिरडी संस्थान कमिटीनें तारीख १ माहे जानेवारी सन १९४५ पासून त्या मासिकाची वर्गणी १ रुपया आणि ८ आणे (पोस्टाचा खर्च धरून) पर्यंत कमी केली आहे. तरी ज्या वर्गणादारांनीं मागील अंकांची वर्गणी पाठविली नसेल त्यांनीं ती वर्गणी व सन १९४५ सालची वर्गणी खालीं लिहिलेल्या पत्त्यावर पाठवावी :

श्रीयुत रा. रा. **श्रीधर नारायण खारकर,**

ऑनररी खजिनदार, शिरडी संस्थान, ३७ चरई रोड, ठाणें, जि. ठाणें.

ज्यांस श्री साई लीलेंत श्रीसाईबाबांचे अनुभव व त्यांचेसंबंधीं इतर महत्त्वाची हकीकत प्रसिद्ध करावयाची असेल त्यांनीं ती फक्त त्या मासिकाचे संपादकाकडे पाठवावी. त्यांचें नांव व पत्ता खालीं दिला आहे:—

रावसाहेब **यशवंत जनार्दन गाळवणकर,** बी. ए.

श्रीसाई प्रसाद, टर्नर रोड, वांद्रें, मुंबई नंबर २०

२ श्रीसाई सच्चरित्राची दुसरी आवृत्ति व श्रीसाई सच्चरित्राचे इंग्रजी भाषान्तराचें पुस्तक अशीं दोन्हीं पुस्तकें संस्थान कमिटीनें छापावयास घेतलीं आहेत.

ता. १ माहे जानेवारी सन १९४५ **यशवंत जनार्दन गाळवणकर**

संपादक

---

# शिरडी वृत्त

## आक्टोबर १९४४

या महिन्यांत नेहमींप्रमाणें मद्रासकडील भक्तमंडळी श्रींचे दर्शनास येऊन गेली.

## देणग्या अर्पण केल्या त्यांचा तपशील

१ श्री. व्ही. एस. शास्त्री व श्री. पी. एन्. नारायणराव, ३० फोर्ट सेंटर स्ट्रीट, बसवनगुडी, बेंगळूर, यांचेकडून गलेफ (सटीन) रंग पिवळा, किनार चाकलेट रंगाची असलेली.

२ श्री. व्ही. आर. धनकोटी, गार्ड N. S. Ry. काजीपेठ (हैद्राबाद डे.) यांचेकडून चांदीचे पत्र्याचे नाक व चांदीचा तुकडा मिळून वजन भार ४.

३ श्री. जगन्नाथ आत्माराम रेगे, विश्वनाथ निवास, मु. परेळ, मुंबई नं. १२, यांचेकडून चंदनाचें खोड लहान.

४ श्री. ए. माणीक मुदलीयार, मिलीटरी हॉस्पिटल, आय. एम. एच. पुणें; यांचेकडून रेशमी कापड वार तीन, ३ रंग तांबडा.

५ श्री. बी. ए. चौगुले फ. क्ला. स. जज्जसाहेब, मु. सातारा; यांचेकडून अर्धा तोळा केशर, हस्तें श्री. बा. ल. झेंडे—सातारा.

## धर्मकृत्यें

अभिषेक, अर्चनें, लघुरुद्र, पूजा, ब्राह्मण सुवासीन भोजन, अन्नदान वगैरे नेहमींप्रमाणें झालें.

विशेष—श्री. शंकरराव डी. बलवल्ली ( ऑ. चि. ) यांनीं ता. १०।१०।४४ गुरुवार रोजीं श्रीचे समाधीस लघुरुद्र, अभिषेक नैवेद्य व ब्राह्मणभोजन दिलें. तसेंच ता. २६।१०।४४ रोजीं श्री. एम्. रंगप्पा अडोनीकर यांचे पत्रावरून श्रींचे समाधीस लघुरुद्राभिषेक, महानैवेद्य, तुपाचा नंदादीप, ब्राह्मण भोजन देणेंत आलें.

## कीर्तनें

संस्थान गवई यांचीं तीन ३ कीर्तनें झालीं. आश्विन वद्य ११ व कार्तिक शु. ११ व कोजागिरीचे दिवशीं एक अशीं झालीं. बाहेर गांवचे हरिदास ह. भ. प. पोपटबुवा लोहणेकर यांचें श्रीमंदिरांत ता. ६।१०।४४ रोजीं रात्रौ कीर्तन झालें. बुवांना संस्थानकडून प्रसाद देणेंत आला.

## नवल विशेष

श्री. बी. एस. कासोदेकर मु. कासोदा ( खानदेश ) ( कवाली ) गायनाची हजेरी श्रीपुढें दिली. संस्थानकडून त्यांस प्रसाद देण्यांत आला.

कार्तिकी महाएकादशीनिमित्त श्रींचे समाधीस पंचामृत ( मंगल ) स्नान घातलें व गांवांतून श्रीच्या तसबिरीची मिरवणूक काढणेंत आली, व संस्थान गवई यांचें कीर्तन झालें. रात्रौ श्रीमंदिरांत श्री. नेरेकर, सबरजिस्ट्रार राहाता, यांचे शास्त्रोक्त गायन झालें.

शिर्डी येथील हवापाणी उत्तम आहे.

---

## नवंबर

बाहेरगांवची भक्तमंडळी नेहमीप्रमाणें या महिन्यांतही आली होती.

## देणग्या अर्पण करण्यांत आल्या त्या

१ श्री. रावसाहेब श्रीमान् नारायण, पब्लिक प्रासिक्यूटर, गुंटुर, यांचेकडून शुभ्रकाठी उपरणें पान एक ( सुती )

२ श्री. सौ. डी. श्रीमन् नारायण पब्लिक प्रासिक्यूटर, गुंटुर, यांचेकडून शुभ्रकाठी उपरणें पान एक ( सुती )

३ श्री बापुमुदलीयार, M. E. S. देहूरोड; यांचेकडून शर्टिंग कापड ( सुती ) वार तीन ३.

४ श्री. ए. के. एन. कर्ता, मु. पो. नेल्लोर; यांचेकडून चांदीचा स्क्रीन वजन तोळे ( ९$\frac{3}{4}$ ).

५ श्री. नादीरशहाशेट पेस्तनजी, चिखलवाडी, मुंबई नं. ८, यांचेकडून शुभ्र काठी उपरणें पान एक ( सुती )

६ श्री. टी. टी. रामलिंगम्, २४ मेन रोड, मद्रास यांचेकडून चांदीचा नाग, वजन भार ३.

७ श्री. खंडेराव यशवंत जुन्नरकर, राजगुरूची चाळ, बडोदा; यांचेकडून दोन लहान चांदीच्या विष्णू मूर्ती, ( वजन भार ६ ) अर्पण.

## धर्मकृत्यें

अभिषेक, अर्चन, लघुरुद्र, पूजा, ब्राह्मण सुवासीन, भोजन, नैवेद्य, अन्नदान, वगैरे धर्मकृत्यें नेहमींप्रमाणें झालीं. विशेष—श्री. बी. भाष्यकारलु नायडू गांधी, नगर बेंगलूर, यांचेतर्फे गरीबास गूळशिरा वांटण्यांत आला व श्रीस लघुरुद्र, ब्राह्मण भोजन दिलें. श्री. शंकरराव ( ऑ. चि. ) यांनीं श्रीस लघुरुद्र व ब्राह्मण भोजन दिलें. श्री. नादीरशहा पेस्तनजीशेट, मुंबई यांनीं श्रीस पांच दिवस लघुरुद्र, तुपाचा नंदादीप, दुधाचे अभिषेक वगैरे बरेंच धर्मकृत्य केलें.

## कीर्तन

संस्थान गवई यांची का० व० ११ व श्रीज्ञानेश्वरमहाराज पुण्यतिथी मार्गशीर्ष शु० ११ व श्रीदत्तजयंती अशीं श्रीमंदिरांत चार कीर्तनें झालीं.

## नवल विशेष

शिर्डीची हवापाणी उत्तम आहे.

आपला नम्र,

**विट्ठल य. मराठे**



## THE UNIVERSAL ANTHEM.

One Cosmic Brotherhood,
One Universal God,
One Source, One Sway.

One Law Beholding Us,
One Purpose Moulding Us,
One Life Enfolding Us,
In Love Always.

Anger, Resentment, Hate
Long Made Us Desolate,
Their Reign Is Done.

Race, Colour, Creed and Caste,
Fade In The Dreamy Past,
Man Wakes To Learn At Last
All Life Is One.

S. N. KHARKAR

# Shree Sai Baba
## Gold dust

(1) He who chooses God or a Sadguru as his guide will never lose his way, even in the dark.

(2) Ups and downs in life are the order of nature, perhaps ordained to chasten our character and smoothen its angularities leading it ultimately to perfectien.

(3) In truth, sublime words make not a saint and a justman; but it is a virtuous life that maketh one dear to God or to a Sadguru.

(4) In all your trials have recourse at once to God or to Sadguru with confidence and you will be comforted, enlightened and instructed.

(5) A wound inflicted by arrows heals, a wood cut down by an axe grows, but harsh words are hateful—a wound inflicted by them does not heal. Arrows of different sorts can be extracted from the body, but a word-dart cannot be drawn out, for it is seated in the heart. Mahabharat

Santdasanudas
Y. G. GALVANKAR.

## Shree Sai Baba's Wonderful Experience

Miss Tarabai Gorakshakar belonging to a Pathare Prabhu family residing at Santacruz in the Suburban of Bombay, who is a great devotee of Shree Sai Baba, is serving as a nurse in one of the hospitals at Dadar. On 12th Decembur 1944 at about 2 oclock at night when she was on her duty in the hospital a well built man entered the hospital by a back door which remained opened through oversight and walked slowly into the nurse's room and suddenly picked up a blanket from the empty cot and fastened it round her head in such a way that she would not be able to cry for help. However with a great difficulty she cried for help but no one came to rescue her. The intention of the man was to keep her in that state and to steal valuable instruments and other things from the hospital. When she saw that she was helpless she cried thrice " Shree Sai Baba, save me ". As soon as she uttered these words the thief got frightened and ran away after bolting the door from outside with a view to prevent any person catching him. Thus the nurse got relief and she began to praise Shree Sai Baba for saving her at the nick of time.

# SHIRDI SANSTHAN OF SHREE SAI BABA

## IMPORTANT NOTICE

The Committee of The Shirdi Sansthan of Shree Sai Baba notifies for the information of the devotees of Shree Sai Baba that, with effect from 1st January 1945, any subscriptions for the Shirdi Sansthan of Shree Sai Baba, should be sent to any of the following Officers of the Sansthan and receipts should be obtained from them:—

(1) **Mr. S. N. Kharkar,**
*Hony. Treasurer, Shirdi Sansthan,*
37, Charai Road, Thana, Dist. Thana.

(2) The Manager of Shirdi Sansthan,
at Shirdi VIA Post Rahata,
Taluka Kopergaum, Dist, Ahmednagar.

2 The Sansthan will not be responsible if they are sent otherwise.

3. Remittances by Postal Orders or cheques will not be accepted.

4. No money should be sent in ordinary Postal covers. The Sansthan will not be responsible for such remittances. It is an offence under the Postal Act.

*By Order,*

*Dated 1st January 1945.*

**Shankerrao D. Ballawalli,**
*Hony. Secretary,*
Shirdi Sansthan.

17

# NOTICE.

Owing to the present Govt. paper control order the pages of Shree Sai Lila Masik ( Quarterly Issue ) cannot exceed 18 pages (i ncluding cover pages). The Sansthan Committee has, therefore, reduced with effect from 1st January 1945, the annual subscription of the Masik from Rs. 3-8-0 to Rs. 1-8-0 including postage. The subscribers are, thereforer, equested to send as soon as possible their past snbscriptions, if they have not been paid already and to send their subscription for the year 1945 to " Mr. S. N. Kharkar, Hon. Treasurer, Shirdi Sansthan, 37 Charai Road, Thana, District Thana" and only the correspondence regarding the matter to be printed in the Sai Lila Viz. experiences of Shree Sai Baba, etc. should be sent to the Editor of that Masik, whose name and address are given below :—

" Rao Saheb Y. J, Galvankar, B. A.,
Shree Sai Prasad,
16, Turner Road, Bandra,
Bombay No. 20.

2. In this issue English translation of a chapter of Shree Sai Satcharitra has not been given, as a separate book containing English translation of all the chapters of Shree Sai Satcharitra is being printed.

Dated 1st January 1945.

Y. J. Galvankar,
EDITOR.

19

# श्री. साईबाबा शिरडी संस्थान

## विक्रीकरितां पुस्तकें

| | | |
|---|---|---|
| ( १ ) सच्चरित्र कै. गो. द. दाभोळकरकृत | | किं. रु. ५–१०–० |
| ( २ ) दासगणूकृत श्रीसाईनाथ स्तवनमंजरी | | ,, ०––२–० |
| ( ३ ) ,, ,, ( अध्याय ४ ) | | ,, ०––८–० |
| ( ४ ) सगुणोपासना | | ,, ०––२–० |
| ( ५ ) संस्थानचे नियम पुस्तक ( मराठी ) | | ,, ०––६–० |
| ( 6 ) A glimpse of Indian spirituality by Rao Bahadur M. W. Pradhan B. A., LL. B., ADVOCATE & J. P. | | ,, 1—4-0 |
| ( 7 ) Rules:-Shirdi Sansthan of Shri Sai Baba ( English ) | | ,, 0—3-0 |

वरील पुस्तकांकरितां खालील पत्त्यावर लिहून खुलासा घेणें—

( १ ) मॅनेजर शिरडी संस्थान, मु. शिरडी, पो. रहाते, जि. अहमदनगर

( २ ) ऑ. चि. शं. द. बलवल्ली, वाकोला-सांताक्रुझ मुंबई नं. २३

---

रावसाहेब यशवंत जनार्दन गालवणकर एडिटर, श्री साईलीला यांनीं रामकृष्ण प्रिंटिंग प्रेस, ज्युडेक्स बिल्डिंग, त्रिभुवन रोड, मुंबई नं. ४ येथें छापून तेथेंच प्रसिद्ध केलें.